**जिल्हा परिषदेतील जिल्हा तांत्रिक सेवा, वर्ग-३ (बांधकाम) संवर्गातील कनिष्ठ अभियंता यांची दि.०१.०१.२०१५ रोजीची अंतिम ज्येष्ठता सूचीतील आक्षेपाबाबत-**

---

**श्री.पी.डी.नगराळे,सहायक अभियंता, श्रेणी-२ जि.प. नागपूर.**

**महाराष्ट्र शासन**

ग्रामविकास विभाग

शासन आदेश क्र.झेडएनजी-२०१५/प्र.क्र.३७/आस्था-४

बांधकाम भवन, २५, मर्झबान रोड, फोर्ट

मुंबई-४०० ००१.

**दिनांक**-२५ **मे**,२०१८.

<u>वाचा :-</u>

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश ) नियम,१९६७.
२. मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र.६१५/२०१५ मध्ये दिलेला न्यायनिर्णय.
३. शासन परिपत्रक, ग्रामविकास विभाग क्र.जिपअ-२०१७/प्र.क्र.२५/आस्था-४, दि.३०.५.२०१७
४. उप आयुक्त (आस्था), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांचे दिनांक २०.०९.२०१६ रोजीचे पत्र.
५. शासन समक्रमांकाचे दि.११.०४.२०१८ रोजीचे पत्र.
६. उप आयुक्त (आस्था.) विभागीय आयुक्त कार्यालय,नागपूर यांचे दि.१५ मे,२०१८ रोजीचे पत्र.

**<u>शुध्दीपत्रक :</u>**

जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३ (बांधकाम) संवर्गातील जिल्हा परिषदेतील कनिष्ठ अभियंत्यांची दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजीची अंतिम ज्येष्ठता सुची संदर्भ क्रमांक ३ येथील परिपत्रकान्वये प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

२. प्रस्तुत ज्येष्ठता सूचीतील अनुक्रमांक १७६ येथे नमूद श्री.पी.डी.नगराळे, सहा.अभियंता (श्रेणी-२), जिल्हा परिषद, नागपूर यांनी त्यांच्या नियमित नियुक्तीच्या दिनांकासंदर्भातील आक्षेपांच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायलय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र.६१५/२०१५ दाखल केली होती. सदर याचिकेचा निर्णय देताना मा.न्यायालयाने संबंधित जिल्हा परिषदेस, श्री.नगराळे यांच्या प्रकरणी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम,१९६७ च्या आंतर जिल्हा बदलीच्या कलम ६(८) (२) नुसार कार्यवाही करण्याचे आदेशित केले होते. सदर प्रकरणी उप आयुक्त (आस्था), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांनी संदर्भ क्र.४ येथील पत्रान्वये शासनास मार्गदर्शन करण्याची विनंती केली होती.

३. श्री.नगराळे, सहायक अभियंता श्रेणी-२ जिल्हा परिषद, नागपूर व श्री.आर.एस.लभाणे, शाखा अभियंता, जिल्हा परिषद, यवतमाळ यांची परस्पर संमतीने (Mutual Consent) बदली करण्यात आलेली होती. महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम,१९६७ च्या आंतर जिल्हा बदलीच्या कलम ६(८) (२) नुसार, **आपसात (परस्पर) बदलीने अशी नेमणूक झाल्यावर नेमणूक झालेली व्यक्ती आपल्या पूर्वीच्या जिल्हा परिषदेची ज्येष्ठता कायम ठेवील किंवा ज्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या पदावर परस्पर बदलीद्वारे नेमणूक झाली असेल त्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता या दोहोंपैकी जी कमी असेल ती ज्येष्ठता स्वीकारेल** अशी तरतूद करण्यात आली आहे. सदरहू तरतूदीनुसार, श्री.नगराळे व श्री.आर.एस.लभाणे यांच्या पैकी कनिष्ठ असलेल्या अभियंत्यांची ज्येष्ठता निश्चित होणे आवश्यक आहे. त्यानुसार श्री. नगराळे यांची कनिष्ठ अभियंता पदावरील नियमित नियुक्तीचा दिनांक ११.१०.१९९५ असा असून श्री.लभाने यांचा नियमित नियुक्तीचा दिनांक १०.०१.१९९५ असा आहे. यास्तव, उपरोक्त प्रकरणी श्री.नगराळे,सहायक अभियंता,श्रेणी-२ यांची सेवाज्येष्ठता अबाधित राहून त्यांचा कनिष्ठ अभियंता पदावरील नियमित नियुक्तीचा दिनांक ११.१०.१९९५ असा निश्चित करण्याबाबत संदर्भ क्र.५ येथील पत्रान्वये कळविण्यात आले होते.

या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नागपूर यांनी दि.२.५.२०१८रोजीच्या आदेशान्वये श्री.नगराळे,सहा.अभि.श्रेणी-२ यांना नियमित नियुक्तीकरिता दि.११.१०.१९९५ हा दिनांक दिला आहे. सदर दुरूस्तीच्या अनुषंगाने संदर्भ क्र.६ अन्वये उपायुक्त,आस्था यांनी श्री.नगराळे यांच्या सेवाज्येष्ठता यादीतील नियुक्ती दिनांकात बदल करण्याबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने, त्यांच्या नावाचा समावेश

जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३ (बांधकाम) संवर्गातील जिल्हा परिषदेतील कनिष्ठ अभियंत्यांच्या दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजीच्या अंतिम ज्येष्ठता सूचीच्या भाग-१ मधील अनुक्रमांक **५४ अ** येथे घेण्यात येत आहे. सदरहू दुरुस्तीच्या अनुषंगाने आवश्यक विवरणपत्राचा तपशील सोबत जोडण्यात येत आहे.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक२०१८०५२५१०४५१५५५२० असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vivek Ramesh Shinde

Digitally signed by Vivek Ramesh Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=98222e73b61528cee875e0cab75e02437703c365921479fb0198fcf43d79d224, serialNumber=3d2f2d59501068679dd214122d63cb4d2d18b76f5a89cae6eca0162ae6701444, cn=Vivek Ramesh Shinde
Date: 2018.05.25 15:47:30 +05'30'

(वि.र.शिंदे)

कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रत-

१) सचिव (ग्रामविकास व पंचायत राज) ,यांचे स्वीय सहायक,बांधकाम भवन,फोर्ट, मुंबई.
२) उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,मुंबई.
३) उपायुक्त (आस्था.) विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर.
४) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नागपूर.
५) निवडनस्ती (आस्था-४).

शासन आदेश क्रमांक: झेडएनजी-२०१५/प्र.क्र.३७/आस्था-४, दि. २५ मे, २०१८ सोबतचे विवरणपत्र

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | | जिल्हा परिषद | जन्मदिनांक | शैक्षणिक अर्हता | पदावरील नियमित नियुक्तीचा दिनांक | जात प्रवर्ग | व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण/सुट | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| ५४अ | श्री. | पी.डी.नगराळे | नागपूर | ०४.१२.१९६५ | बी.ई | ११.१०.१९९५ | अ.जा. | उत्तीर्ण | आंतर जिल्हा बदलीने पदस्थापना (Mutual) |